FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

## पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( **Under Section 154 Cr. P.C.**)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. १०, वर्ष Year २०१८, दिनांक Date ०८/०३/२०१८
2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि.१९८८ कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........
3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day गुरुवार, तारीख पासून Date from ०८/०३/२०१८ वेळ Time १६:००, तारीख पर्यंत Date to ०८/०३/१८ वेळ Time १६:०८ वा. पर्यंत
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date ०८/०३/२०१८, वेळ Time १६:००
   (c) गुन्हा दाखल झालेया सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ४८/२०१८, तारीख Date ०८/०३/१८ वेळ Time २३:०५
4. माहितीचा प्रकार Type of Information : समक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name तहसीलदार व नगर भूमापन कार्यालय, बोरीवली (प) मुंबई-९२ No. if any Ward Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station बोरीवली, तालुका Taluka बोरीवली, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name प्रशांत राणे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name अंकुश राणे
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ३७ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ........
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation वकीली
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ........, उपजात Sub Caste ........
   (h) पत्ता Address : बी/४०४, कृष्णा टॉवर, श्रीकृष्ण सोसायटी, आनंदनगर (Ward, House Name No., Phone/M. No., PAN No., वोटर्स नं. Card No.)
   रस्त्याचे नाव Road छत्रपती शिवाजी कॉम्पलेक्स रोड २, दहिसर (पूर्व) मुंबई-६८ (जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place, गाव Village, पोस्ट Post, पो. स्टे. P. Stn.)
   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   श्री. तावरे, नगर भूमापन अधिकारी बोरीवली (प)

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs)-8-2016-PA3-(K) 460

फिर्याद दि. ०९/०३/२०१८

यातील फिर्यादी श्री. प्रशांत अंकुश राठो, वि ३७ वर्षे यांचा स्वतंत्र कागदावर टंकलिखित केलेला जबाब हिच गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(संजय शिंदे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

09.03.2018

फिर्याद दिनांक ०९/०३/२०१८

श्री. प्रशांत अंकुश राणे, वय ३७ वर्ष, धंदा — वकील, रा.ठी.— बी/४०४, कृष्णा टॉवर, श्रीकृष्ण सोसायटी, आनंद नगर, छत्रपती शिवाजी कॉम्पलेक्स रोड नं.२, सांजी हॉटेल समोर, दहिसर (पूर्व) मुंबई ४०००६८, भ्रमणध्वनी क्र. ९८९२१०४६३८

——

मी वरिल प्रमाणे असून वरील नमुद पत्यावर गेल्या आठ वर्षापासून माझ्या कुटुंबासह रहावयास आहे. मी व्यवसायाने वकील आहे. माझे कार्यालय बी/१०७, तळमजला, आर्चिड प्लाझा, मूव्ही जेम सिनेमा कंपाऊड, मराठा कॉलनी रोड, दहिसर (पूर्व) मुंबई— ६८ या ठिकाणी आहे. दिनांक २७.५.२०१७ रोजी सिंडीकेट बॅंक स्टाफ, अभिमान को.ऑ.हौसिंग सोसायटी लि., पत्ता — एफपी/२७५, प्लॉट नं.२१, कस्तूर पार्क, शिंपोली रोड, बोरीवली (प.), मुंबई— ९२ यांनी त्यांचे सोसायटीच्यावतीने शासकीय/निमशासकीय कार्यालयातील कामकाज करण्याकरीता माझी नेमणूक केली आहे.

त्याप्रमाणे मी सदर सोसायटीच्यावतीने नगर भूमापन अधिकारी बोरीवली कार्यालय, तहसीलदार व नगर भूमापन कार्यालय, चौथा मजला, नाटकवाला लेन, बोरीवली (प) मुंबई. ९२ या ठिकाणी नमूद सोसायटीच्या नावे स्वतंत्र मिळकत पत्रिका करण्याकरीता अर्ज दिला होता. सदर अर्जा सोबत मी नमूद सोसायटीचा ७/१२ उतारा, सूची क्र. २, बिनशेती आदेश, मिळकत पत्रिका, पोटविभाजन आदेश इत्यादी कागदपत्रे सादर केली होती. त्याबाबत मी नमूद कार्यालयाची पोच घेतली होती. त्यानंतर नमूद कार्यालयातील संबंधित अधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे मी वेळोवेळी कागदपत्रांची पुर्तता केली होती. वर नमूद कार्यालयात कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतरही काम होत नसल्याने मी नमूद कार्यालयाचे श्री.तावरे, नगर भूमापन अधिकारी यांनाही भेटलो होतो.

फेब्रुवारी— २०१८ च्या शेवटच्या आठवडयात मी वर नमूद कार्यालयातील श्री.तावरे, नगर भूमापन अधिकारी यांची भेट घेवून माझे काम लवकर करण्याबाबत विनंती केली असता, श्री. तावरे यांनी वरील नमूद काम लवकर करण्यासाठी माझ्याकडे रू. २,००,०००/— इतकी लाचेची मागणी केली होती. मला श्री. तावरे, नगर भूमापन अधिकारी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी आज रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात येवुन नगर भूमापन अधिकारी, बोरीवली कार्यालयाचे श्री.तावरे, नगर भूमापन अधिकारी यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई होण्याकरीता इंग्रजीत लेखी तक्रार दिली आहे.

मी वरील प्रमाणे तक्रार दिल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. संजय शिंदे यांनी मी दिलेल्या तक्रारीची दोन शासकिय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे मला सांगितले. सदर पडताळणीच्या वेळी लोकसेवक श्री. तावरे यांचेकडे भेटीस जाताना मला

09.03.2018

डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून टी शर्टच्या आतील बनियनला लावण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

पो.नि.शिंदे यांनी माझे तसेच दोन्ही पंचाचे वक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर मी, पंच, पो.नि. शिंदे, सपोआ विजयकर व पो.शि.मठपती व पोलीस पथक असे लोकसेवकाची प्रत्यक्ष भेट घेण्याकरिता आवश्यक साधनसामुग्रीसह माझे मोटार वाहन क्र. एम.एच. ४८–एसी–४६४४ व दोन पोलीस वाहनांतून रवाना झालो. त्यानंतर मागाठाणे बस आगार, बोरीवली (पूर्व) च्या अलिकडे कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने माझी गाडी व पोलीस वाहने थांबविण्यात आली. पो.नि.शिंदे यांनी पोलीस पथकास आवश्यक त्या सूचना देवून तेथेच थांबण्यास सांगितले. त्यानंतर मी, पंच श्री. पाटील, पो.नि.शिंदे, सपोआ विजयकर आणि पो.शि.मठपती असे माझे वाहनातून सागरदिप दर्शन सोसायटी समोर, एस.व्ही.रोड, बोरीवली (प) या ठिकाणी पोहचलो. सदर ठिकाणी पो.नि.शिंदे यांनी मला व पंच श्री. पाटील यांना आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर माझ्या गाडीच्या काचा बंद करून पो.नि. शिंदे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून तो माझे ग्रे कलरच्या टी शर्टच्या आतील बनियनला अडकविला.

मी व पंच श्री. पाटील माझ्या गाडीतून उतरून पायी चालत लोकसेवक श्री. तावरे यांचे नगर भूमापन अधिकारी बोरीवली कार्यालय, चौथा मजला येथील कार्यालयात आलो. त्यानंतर मी श्री. तावरे, नगर भूमापन अधिकारी यांच्याशी अभिमान या सोसायटीच्या नावे स्वतंत्र मिळकत पत्रिका करण्या संदर्भात कामाची चर्चा केली असता, श्री. तावरे यांनी माझ्याकडे रू. २,००,०००/– इतक्या लाचेची मागणी केली. तसेच सोमवार दिनांक १२/०३/२०१८ रोजी लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगितले. सदर वेळी पंच श्री. पाटील हे माझे शेजारी लोकसेवक श्री.तावरे यांचे कार्यालयात बसले होते.

श्री. तावरे यांच्याशी चर्चा करून मी व पंच श्री. पाटील पुन्हा पायी चालत माझ्या गाडीत येवून बसलो. त्यावेळी पो.नि.शिंदे यांनी माझ्या टी शर्टच्या आतील बाजूस लावलेला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन तो बंद केला. त्यानंतर पो.नि.शिंदे यांनी पंच श्री.पाटील यांच्याकडे माझ्यात व लोकसेवक यांच्यात काय चर्चा झाली याबाबत विचारणा केली असता, पंच श्री.पाटील यांनी सांगिले की, श्री. तावरे, नगर भूमापन अधिकारी यांनी अभिमान या सोसायटीच्या नावे स्वतंत्र मिळकत पत्रिका करण्या संदर्भात कामाची चर्चा करून माझ्याकडे रू. २,००,०००/– इतक्या लाचेची मागणी केली असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि.शिंदे यांनी मला लोकसेवक व माझ्या मध्ये झालेल्या संभाषणाबाबत विचारणा केली असता मी सुध्दा वरील प्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पो.नि.शिंदे यांनी माझे गाडीच्या काचा बंद करून माझे व पंचाचे समक्ष डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून त्यातील माझे व लोकसेवक श्री.तावरे यांचे झालेले संभाषण ऐकले. त्यामध्ये लोकसेवक श्री. तावरे यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने पो.नि.

09.03.2018

शिंदे यांनी पुढील कायदेशीर कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात करण्यात येणार असल्याचे मला सांगितले. त्याप्रमाणे मी, पंच व पोलीस पथक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात परत आलो.

पो.नि.शिंदे यांनी मला व पंचांना गोपनीय कक्षात नेउन माझे व लोकसेवक श्री. तावरे यांचे प्रत्यक्ष भेटी दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकवले. त्यानंतर पो.शि.मठपती यांनी सदर संभाषण ऐकुन माझ्या मदतीने माझा व लोकसेवक श्री.तावरे यांचा आवाज ओळखुन नामोल्लेख करून ट्रान्सक्रिप्ट लॅपटॉप वर टंकलिखित केले. तसेच पडताळणी पंचनामा तयार केला. त्यांनतर पडताळणी मध्ये लोकसेवक श्री.तावरे यांनी माझ्याकडे अभिमान या सोसायटीच्या नावे स्वतंत्र मिळकत पत्रिका करण्याकरीता लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाल्याने माझा सविस्तर जबाब नोंद केला.

माझे व लोकसेवक श्री.तावरे यांच्यात कोणतेही पुर्व वैमनस्य नाही. तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक देवाणघेवाणीचा व्यवहार नाही.

लोकसेवक श्री. तावरे, नगर भूमापन अधिकारी यांनी सिंडीकेट बॅक स्टाफ, अभिमान को.ऑ.हौसिंग सोसायटी लि., या सोसायटीचे नावे स्वतंत्र मिळकत पत्रिका करण्याकरीता माझ्याकडे स्वत:च्या फायदयाकरिता बेकायदेशीररित्या रू. २,००,०००/— इतक्या रक्कमेच्या लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे मान्य केले, म्हणून माझी लोकसेवक श्री.तावरे, नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई होणेकरिता तक्रार आहे.

समक्ष

( संजय शिंदे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.

09.03.2018

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे : तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant/Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

वरील नमूद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी नामे तावरे, नगर भूमापन अधिकारी, तहसिलदार व नगर भूमापन कार्यालय, बोरीवली यांनी फिर्यादी नामे प्रशांत राणे यांना अधिकार प्राप्त अभिमान को.ऑ.हौ.सो., शिंपोली रोड, बोरीवली या सोसायटीचे स्वतंत्र मिळकत पत्रिका तयार करुन देण्याच्या कामाकरीता स्वतःच्या फायद्याकरीता बेकायदेशीर दिल्या परिश्रमाखेरीज रुपये 2,00,000/- रकमेच्या लाचेची मागणी करुन ती स्विकारण्याचे मान्य केले म्हणून भ्र.प्र.अधि.1988 कलम 7 अन्वये गुन्हा.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करुन तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

श्री. संजय गणपत शिंदे, पोलीस निरीक्षक.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)............ Rank............ No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to............ (3) Transferred to P. S. ............ District............ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

09.02.2018

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name संजय गणपत शिंदे

पदनाम Rank पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई.

तपासिक अं. चा कोड क्र.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख

1. Date and time of submitted to the Court

Posting

Code No. of I. O. ............

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**